# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

MMRDA

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

सी - १४ व १५, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१,

दुरध्वनी : २६५९ ४००० / २६५९०००१-०४ फॅक्स : २६५९१२६४

ई-मेल : mmrda@giasbm01.vsnl.net.in वेबसाईट : http://www.mmrdamumbai.org

## खालील पदे नियमित स्वरुपात भरण्यासाठी अर्ज मागवित आहेत.

### १) वरिष्ठ नियोजक : २ पदे (१ - अनु. जमाती, १ - खुला)

शैक्षणिक अर्हता : वास्तुशास्त्र किंवा स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा तत्सम किंवा समाजशास्त्र किंवा निसर्ग शास्त्रामधील पदव्युत्तर पदवी, आणि, नागरी आणि प्रादेशिक नियोजनामधील किंवा तत्सम किंवा नागरी संकल्प चित्र या विषयातील पदव्युत्तर पदवी/पदविका किंवा तत्सम, तसेच भारतीय नगर नियोजन संस्थेशी व्यावसायिक संलग्नता किंवा तत्सम मान्यता प्राप्त संस्थेशी संलग्नता असावी.

वय : ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. मुं.म.प्र.वि. प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना वयोमर्यादा लागू नाही.

अनुभव : नागरी व प्रादेशिक नियोजन क्षेत्रामधील स्वतंत्र, जबाबदार पदाचा सात वर्षाचा अनुभव.

वेतन श्रेणी : रु. १५,६०० ते ३९,१००/-

ग्रेड पे : रु. ७,६००/-

एकुण वेतन : रु. ४७,४१५/-

### २) नियोजक : २ पदे (१ - अनु. जमाती, १ - खुला)

शैक्षणिक अर्हता : वास्तुशास्त्र किंवा स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा तत्सम किंवा समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी, आणि नियोजन किंवा नागरी संकल्प चित्र या विषयातील पदव्युत्तर पदवी/पदविका.

वय : ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. मुं.म.प्र.वि. प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना वयोमर्यादा लागू नाही.

अनुभव : नागरी नियोजन आणि विकास या क्षेत्रामधील कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव.

वेतन श्रेणी : रु. १५,६०० ते ३९,१००/-

ग्रेड पे : रु. ६,६००/-

एकुण वेतन : रु. ४०,९००/-

### ३) उप-नियोजक : ७ पदे (२ - अनु. जमाती, २ - वि.जा.भ.ज. ३ - खुला)

शैक्षणिक अर्हता : वास्तुशास्त्र किंवा स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा तत्सम किंवा समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी आणि नियोजन किंवा नागरी संकल्प चित्र या विषयातील पदव्युत्तर पदवी/पदविका.

वय : ४० वर्षापेक्षा जास्त नसावे.

अनुभव : एक वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

वेतन श्रेणी : रु. ९,३००/- ते ३४,८००/-

ग्रेड पे : रु. ५,४००/-

एकुण वेतन : रु. ३२,२६५/-

### ४) कनिष्ठ नियोजक : २ पदे ( १ - वि.जा.भ.ज. १ - खुला)

शैक्षणिक अर्हता : वास्तुशास्त्र किवा स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी.

वय : ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

अनुभव : नगर नियोजन/शहर नियोजनाचा तीन वर्षाचा अनुभव अपेक्षित.

वेतन श्रेणी : रु. ९,३००/- ते ३४,८००/-

ग्रेड पे : रु. ४,४००/-

एकुण वेतन : रु. २४,७२१/-

टिप्पणी :-

१) वरील सर्व पदांना वेतना व्यतिरिक्त अंशदायी भविष्य निर्वाह निधी, वैद्यकीय सुविधा, रजा प्रवास सवलत, जी.एस.एल.आय.,ग्रुप ग्रॅच्युटी इ. सुविधा अनुज्ञेय असतील.

२) उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळेस मुळ प्रमाणपत्रे आणि साक्षांकित केलेल्या प्रती आणाव्यात.

३) मागास प्रवर्गातील उमेदवारांकडे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्रधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

४) मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी शासन नियमानुसार वयोमर्यादा शिथिल करण्यात येईल.

५) अपुर्ण माहिती असलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

६) वरील अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी स्वहस्ताक्षरात सध्याचा पासपोर्ट साईज फोटो, पत्र व्यवहाराचा पत्ता व दूरध्वनी/मोबाईल क्रमांक, शैक्षणिक पात्रता, अनुभव, महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रतीसह प्रमुख,नगर व क्षेत्र नियोजन विभाग, ७ वा मजला, मुं.म.प्र.वि.प्रा. वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांचेकडे जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अर्ज सादर करावा. शासकीय,निम-शासकीय,स्थानिक स्वराज्य संस्था, शासन अंगीकृत कार्यालयातील उमेदवाराने त्यांचे अर्ज योग्य त्या मार्गाने पाठवावेत.

सही/-

(एस.व्ही.आर.श्रीनिवास, भाप्रसे)

अति. महानगर आयुक्त

मुं.म.प्र.वि.प्रा.